# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर



## कर आकारणी कर संकलन विभागाचे कामकाजाचे स्वरुप

1)सोलापूर शहरातील ज्या ठिकाणी नविन बांधकाम झालेले आहेत त्या ठिकाणी कर निरिक्षकांकडून प्रत्यक्ष भेट देवून नव्याने कर आकारणी केली जाते. तसेच एखादया मिळकती मध्ये बदल झाली असल्यास त्यानुसार नोंदी घेूवन मुं.प्रा.अधि. 1949 अंतर्गत कर आकारणीचे कार्यवाही करून महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्ना मध्ये सतत वाढ केले जाते. तसेच शहर हद्दीतील थकबाकीदार असलेल्या मिळकतदार व मिळकत करापोटी मिळकती जप्त करून, तात्पुरत्या स्वरूपामध्ये पाणी पुरवठा खंडीत करून म्युन्सीपल कराची जास्तीत जास्त वसुली केली जाते आणि ज्या मिळकतदाराची म्युन्सीपल कराची तक्रारी असतील त्यांच्याकडून अर्ज घेवून मिळकतीची प्रत्यक्ष तपासणी करून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून त्यांना न्याय दिले जाते. परिणामी कर आकारणी बाबतची तक्रारी कमी होणेस मदत होते. याशिवाय माननीयांचे आदेशानुसार कामकाज केले जाते.

2) कर आकारणी कर संकलन खात्यामार्फत पुढील प्रमाणे सेवा दिल्या जातात. मिळकतीबाबत अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जानुसार आशयाचा स्वरूप विचारात घेवून त्याप्रमाणे नागरिकांना आकारणी हस्तांतरण, वारस नोंद, असेसमेंट उतारा, प्रॉपर्टीकार्ड उतारा नविन नळ कनेक्शन दिले असल्यास त्याप्रमाणे नोंदी घेवून सेवा दिल्या जातात. परिणामी म.न.पा. उत्पन्नामध्ये वाढ प्रस्तावित केली जाते.